ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017


REVIEW OF RESEARCH

# गुणवत्तापूर्ण वर्तुळे (Quality circles ) व्यवस्थापन तंत्राचा बी. एड्. आशययुक्त अध्यापनातील उपयुक्ततेचा अभ्यास

डॉ. व्ही. बी. किडगांवकर
द.प्रे.भै. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर

**सारांश :-**

सर्वच क्षेत्रामध्ये गुणवत्ता ही प्राप्त करण्याऱ्या **व्यक्तिपेक्षा** स्वीकारणाऱ्यावरच अवलंबून आहे. ज्या प्रमाणे उद्योग क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूला जोपर्यंत ग्राहक अधिक संख्येने स्वीकारत नाहीत तो पर्यंत तीची गुणवत्ता स्पष्ट होत नाही. त्यासाठी अधिक अधिक चांगली वस्तू तयार करण्यावर उद्योगांच्या भर असतो. याद्दष्टीने विचार करता गुणवत्तापूर्ण वर्तुळे (QC) संकल्पना अनेक क्षेत्रात वापरली जात आहे. या संकल्पेना उपयोग शिक्षणशास्त्र विषयात केला जात आहे. विद्यार्थी गुणवत्ता पूर्ण होण्यासाठी शिक्षक गुणवत्तापूर्ण व्हावेत यासाठी बी.एड्. आशययुक्त अध्यापनाची उपयुक्तता स्पष्ट करण्यासाठी या संकल्पनेचा उपयोग करण्यात आला.




**संकल्पना शब्द :- गुणवत्ता, गुणवत्ता वर्तुळे, आशययुक्त अध्यापन.**

## १) प्रस्तावना :-

आज शिक्षणात होणारे बदल लक्षात घेतात विविध नवीन पध्दती, तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी केल्या जात आहेत. त्याप्रमाणे शिक्षकांना ही आपल्या अध्यापनात बदल करावा लागत आहे. त्यासाठी सेवेत असणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षणाद्वारे, तर छात्र शिक्षकांना विविध कार्यशाळांच्या माध्यमातून नवीन तंत्राविषयी अवगत केले पाहिजे. यासाठी संशोधकाने हे संशोधन करायचे ठरविले आहे.

## २) संशोधन गरज व महत्त्व :-

आशयुक्त अध्यापनाची संकल्पना, कार्य बी.एड्. कार्यशाळेवेळी विद्यार्थ्यांना शिकविले जाते. त्यासाठी अवलंबलेल्या प्रक्रियेत बदल होणे गरजेचे संशोधकाला वाटले. त्याचप्रमाणे शिक्षणातील नव प्रवाहांचा वापर अध्यापनशास्त्रात होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी संशोधकाला या संशोधनाची गरज वाटते.

जर अशा संकल्पना इतर क्षेत्रातील शोधांचा, ज्ञानाचा उपयोग शिक्षणक्षेत्रात होत असेल तर त्या संकल्पना वापरल्या पाहिजेत. अशा शोधावर आधारित संकल्पना वापरल्याने कौशल्य प्राप्तीचा एक वेगळा मार्ग छात्रअध्यापकांना होण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

### ३) संशोधन शीर्षक :-

गुणवत्ता वर्तुळे (Quality Circle ) व्यवस्थापन तंत्राचा आशययुक्त अध्यापनातील उपयुक्ततेचा अभ्यास

### ४) संशोधन उद्दिष्टे :-

१. गुणवत्ता वर्तुळे व आशयुक्त अध्यापन संकल्पनांचा अभ्यास करणे.
२. बी.एड्. सत्र तीन मधील आशययुक्त अध्यापन कार्यशाळेतील गुणवत्ता वर्तुळ संकल्पना वापरावर छात्र अध्यापक प्रतिसादाचा अभ्यास करणे.
३. गुणवत्ता वर्तुळे संकल्पनेचा बी.एड्. कार्यशाळातील उपयोग प्रतिसादाद्वारे स्पष्ट करणे.

### ५) व्याप्ती :-

सदर संशोधनाची व्याप्ती बी.एड्. अभ्यासक्रमातील आशयुक्त अध्यापन कार्य शाळेपुरती आहे. या संशोधनामध्ये दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील आशययुक्त कार्यशाळेमधील प्रक्रियेचा अभ्यास केला आहे.

### ६) मर्यादा :-

हे संशोधन दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील आशययुक्त अध्यापन कार्यशाळे पुरते मर्यादित आहे. त्यापैकी भूगोल अध्यापन पध्दती मधील छात्र अध्यापकापूरते मर्यादित आहे.

### ७) संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा :-

या संशोधनासाठी Wikipedia, vikaspedia, मधील गुणवत्ता नियंत्रण, Deepa sharma & komal ravikala (2006), Quality in Education, delhi : kalpaz publication, Digumurti, B.R. (1997), Education for the २१st century Delhi: Discovery publishing house, chapter in shodganga. Infibnet, http www.ascd.org Ascd pdf इत्यादी संशोधन साहित्याचा व संशोधकांचा आढावा घेण्यात आला.

### ८) संशोधन पध्दती व संशोधन साधने :-

या संशोधनासाठी संशोधन पध्दतीच्या वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला. वर्णनात्मक पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीच्या सर्वेक्षण परीक्षणतील साफल्य परीक्षण (Achievement testsris) पध्दतीचा उपयोग करण्यात आला. त्यासाठी संरचित प्रश्नावली व प्रतिसादक मत तंत्राचा वापर करण्यात आला.

### ९) माहितीचे विश्लेषण :-

१. गुणवत्ता वर्तुळे व्यवस्थापन व आशययुक्त अध्यापन संकल्पनांचे विश्लेषण :-

a. गुणवत्ता वर्तुळ (Quality Circle Techniques )

i. A quality circle is a participatory management technique that enlists the help of employee in solving problems related to their own jobs. Circles are formed of explyees working together in an operation who meet at intervals to discuss problems of quality and to devise solutions for improvements. (www. Inc.com)

व्यवस्थापन शास्त्रातील demings 14 points for management, TQM- Total Quality management in Education]CQI-Continuous Quality Improvements Quality circles management tech. अशा अनेक संकल्पना शिक्षणात वापरल्या जातात. गुणवत्ता वर्तुळे तंत्रामध्ये गटातील सभासद वारंवार एकत्र भेटतात, चर्चा करतात व आपली समस्या सोडवितात. उद्योग क्षेत्रात अशी गुणवत्ता वर्तुळे (QC) कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांची


गुणवत्ता वाढविण्यासाठी या तंत्राचा उपयोग केला जातो. छात्र अध्यापक स्वतःच्या गुणवत्तेसाठी या तंत्राचा वापर करु शकतात.

यामध्ये पुढील वैशिष्टांचा समावेश होतो.


१) Quality circle is a small group of employees
२) Quality circle is organized in the some work area or doing similar type of work.
३) Quality circles are voluntary.
४) Quality circles meet regularly for about on hour every week.
५) Quality circles identifies, analysis and resolves work related problems.
६) Quality circles leads to total performance.
७) Quality circle enrich work life.

## गुणवत्ता वर्तुळ संकल्पना व प्रक्रिया

### A) Quality circles (QCs) - What, How and for whom




### B) Process of QCs




### C) Objectives of QCs in Education

- To develop holistic personality
- To help in self, mutual, organizational development
- To infuse a spirit of duty, responsibility and team work
- To built analytical mind so that people have Scientific approach to problems
- To initiate Total Quality Education (TQE)

**ब) आशययुक्त अध्यापन :-**

विषयज्ञान व अध्यापन पध्दती यांचा विचार करता अध्यापनासाठी विषय ज्ञान चांगले हवे की विषयज्ञान पटवून देण्यासाठी अध्यापन चांगले झाले पाहिजे. यातून बी.एड्. प्रशिक्षणाच विचार करता या दोन्ही अंगाचा विचार करण्यची प्रक्रिया ग्रॉसमन, विल्सन एस.एम. आणि शुल्मन एल.एस. (१९८०) यासाठी अनेक प्रश्नांवर चर्चा केली १९७६-७८ या कालखंडात एन.सी.टी.ई. व यु.जी.सी. विचार मंथनातून या संकल्पनेची गरज स्पष्ट करण्यात आली. महाराष्ट्रात १९७७ च्या NCTE मार्गदर्शनानुसार चर्चा झाली व १९९० नंतर महाराष्ट्रात काही विद्यापीठांनी ही संकल्पना बी.एड्. अभ्यास क्रमात स्वीकारली.

१) आशय व अध्यापन या दोन्हीचा विचार करुन केले जाणारे अध्यापन म्हणजे आशययुक्त अध्यापन होय.

२) Content –cum method clearly implies that there will be meaningful integration of the content & method in terms of observables skills developed in the student teacher.

या संकल्पने अंतर्गत आशयाची संरचना, अभ्यासक्रम-पाठ्यक्रम सहसंबंध, पाठ्यपुस्तक विश्लेषण, आशय घटकाचे आशययुक्त संकल्पने नुसार विश्लेषण करुन पाठ टाचणे तयार केली जातात.एक घटक दोन किंवा अधिक पध्दतीने शिकविण्याचा प्रयत्न करुन आशय व अध्यापन पध्दतीचे एकात्मिकरण केले जाते.

वरील विश्लेषणातून गुणवत्ता वर्तुळ तंत्र व आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करण्यात आला.

**II) गुणवत्ता वर्तुळ (QCs) संकल्पनेचा बी.एड्. आशययुक्त कार्यशाळेत छात्र अध्यापकांचा वापर व प्रतिसाद :-**

गुणवत्ता वर्तुळ ही संकल्पना बी.एड्. आशययुक्त अध्यापन कार्यशाळेत संशोधकाने उपयोग केला. कार्यशाळेमध्ये प्रथम विषय संरचना, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम विश्लेषण, पाठ्यपुस्तक विश्लेषण, पाठ्यघटक विश्लेषण, पाठ टाचणे तयार करणे या प्रमाणे पाच दिवस कार्यशाळा झाली. यामध्ये प्रथम सर्व विद्यार्थ्यासाठी तात्विक माहिती व गटकार्याची स्पष्ट कल्पना दिली जाते. त्यानंतर अध्यापन पध्दतीनुसार गटकार्य केले जाते. सदर कार्यशाळा १७ जुलै २०१७ ते २१ जुलै २०१७ या दरम्यान घेण्यात आली. यासाठी अध्यापन पध्दतीनुसर भूगोल अध्यापन पध्दती गटकार्य घेण्यात आले.

| अ. न. | वार दिनांक | गटकार्य | गुणवत्ता वर्तुळ कार्य प्रश्नावली प्रतिसाद |
|---|---|---|---|
| 1 | सोमवार १९/०७/२०१७ | आशययुक्त अध्यापन तात्विक माहिती व विषय संरचना तयार करणे | भूगोल विषयाची संरचना तयार करण्यासाठी स्तराची निवडीवर चर्चा केली.<br>समान आशय घटकांच्या नोंदी केल्या.<br>विषय संरचना तयार केली यावेळी घटक, उपघटक निवडीवर चर्चा केली. |
| 2 | १९/०७/२०१७ | अभ्यासक्रम पाठ्यक्रम विश्लेषण | अभ्यासक्रमानुसार पाठ्यक्रम पडताळणीवर चर्चा<br>आपला मुद्दा मांडतात.<br>तक्ता स्वरुपात विश्लेषण तक्ता निर्मिती करतात. |
| 3 | १९/०७/२०१७ | पाठ्यपुस्तक विश्लेषण | गटात एका इयत्तेच्या भूगोल पुस्तकाची निवड करतात.<br>पाठ्यपुस्तक विश्लेषण मुद्दयावर आपली मते मांडतात.<br>संज्ञा, संकल्पना, तत्त्वे, भौगोलिक कारणे, नकाशे इ. प्रमाणे विश्लेषण करतात. |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | १९/०७/२०१७ | घटक विश्लेषण | एका इयत्तेतील घटक निवडीवर आपली मते मांडतात. घटकाचे संज्ञा, संकल्पना, माहिती, आकृती, नकाशा, तत्त्वे, गाभाघटक, मूल्ये, क्षमता, जीवन कौशल्यानुसार विश्लेषण करतात. |
| ५ | २१/०७/२०१७ शुक्रवार | पाठ टाचण तयार करणे | आशययुक्त अध्यापन पाठावर चर्चा करतात. पाठ टाचणवर आपले मत मांडतात. भूगोल घटकाची निवड करुन घटक संरचने पासून फलक लेखनापर्यंत पाठ टाचण काढतात व चर्चेत भाग घेतात. |

वरील प्रमाणे गुणवत्ता वर्तुळ संकल्पनेचा उपयो ग करतात व आशययुक्त अध्यापन पध्दतीने पाठ टाचण तयार करतात व त्यामध्ये मार्गदर्शक सूचनेप्रमाणे दुरुस्ती करतात.

### iii) गुणवत्ता वर्तुळ संकल्पनेचा बी.एड्. कार्यशाळेतील उपयोग, प्रतिसादकांची मते घेतल्यानंतर गुणवत्ता वर्तुळ तंत्राचे पुढील उपयोग स्पष्ट होतात. :-

१) गटात कार्य करताना समस्या शोधण्यास मदत झाली.
२) विषय संरचना तयार करताना सर्वांच्या मताचा आदर करुन योग्य संरचना करता आली.
३) अभ्यासक्रम-पाठ्यक्रम-पाठ्यपुस्तक सहसंबध शोधासाठी चर्चेचा उपयोग झाला.
४) पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण करताना संज्ञा, संकल्पना, नियम, आकृत्या इ. चा अर्थ लावण्यासाठी विविध मते, संदर्भ महत्त्वपूर्ण ठरले.
५) घटक विश्लेषण करताना स्वतःचा सूक्ष्म विचार, उदाहरणे मांडण्याची गटात संधी मिळाली.
६) निश्चित उद्दिष्टाने काम करण्यासाठी हे तंत्र उपयुक्त ठरले.

### १०) निष्कर्ष :-

१) गुणवत्ता वर्तुळ तंत्र शिक्षणशास्त्र कार्यशाळेतही वापरता येते.
२) या संकल्पनेमुळे निश्चित ध्येयानुसार कार्य करण्यास मदत होते.
३) या संकल्पनेमुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याची संधी मिळाली व त्यावर चर्चा झाली.
४) या संकल्पने मुळे समस्या सोडविण्याची क्षमता, छात्र अध्यापकात निर्माण होण्यास मदत झाली.
५) या संशोधनामुळे गुणवत्ता वर्तुळ व आशययुक्त अध्यापन संकल्पना स्पष्ट झाली.
६) गुणवत्ता वर्तुळ संकल्पना वापरामुळे विद्यार्थ्यामध्ये सुसंवाद कौशल्य, सहकार्य, इतरांचा विचारांचा आदर करणे व कमीत कमी चूका करण्याच्या कृतींचा विकास होण्यास मदत झाली.
७) स्वतःला ओळखण्याची संधी छात्र अध्यापकाला मिळाली.

### संदर्भ :-

1. Best &kah (2007) Research Education New Delhi:Prentice Hall of India pvt.Ltd.
2. Digumarti B.R.(1997) Education for the zist century Delhi Discovery publishing
3. Jayakamar, anand & Krishna JC (2015); Quality circle formation & implementation
4. Larry chase (1983), Quality circle; Association for supervision & curriculum development. http://www.ascd.org
5. Rohilla, sourabh & choudhary Rajeesh (2016). Quality circle organization & its implementation , Articarticlenternational journal
6. Sharma deepa & kamat ravikala (2006), Quality in Education Delhi : kalpaz publications.

7. Vikaspedia files
8. Wikipedia files
❖ http://www.shodganga.infibnet.ac